Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-III MAR. 2017

Address
· Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
· Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
· (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
· aiirjpramod@gmail.com
· aayushijournal@gmail.com

Website
· www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# गोदाम सेवा क्षेत्राचे महत्व

**डॉ. ए.बी. धालगडे**
विभागप्रमुख, वाणिज्य विभाग,
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा जि. लातूर

**प्रास्ताविक-**

आधुनिक व्यापारी जगात अनेक कारणांनी गोदामाची आवश्यकता निर्माण झाली आहे. सध्याच्या काळात मालाचे उत्पादन मागणी पूर्व केले जात आहे. तसेच त्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे उत्पादन झाल्यापासून माल प्रत्यक्ष ग्राहकाच्या हातात पडेपर्यंत त्याचा साठा करून ठेवावा लागतो तसेच माल खराब होऊ नये म्हणून काळजी घ्यावी लागते. ठराविक हंगामात उत्पादित होणारा माल हा वर्षभर नियमितपणे बाजारपेठेत पुरवावा लागतो. तसेच वर्षभर नियमितपणे बाजारपेठेत तयार होत असलेला माल ठराविक हंगामात विकला जातो म्हणून सध्याच्या काळात गोदामे ही अत्यंत महत्वाची गरज बनली आहेत.

**संशोधनपत्राची उद्दिष्ट्ये-**

- शेतकरी व किरकोळ व्यापा-याच्या दृष्टीने गोदामाचे महत्व अभ्यासणे.
- वितरक, उत्पादक व घाऊक व्यापारी यांच्या दृष्टीने गोदामाचे महत्व अभ्यासणे.
- केंद्र व राज्य सरकारचे गोदाम क्षेत्राचे महत्व अभ्यासणे
- आयात व निर्यातदार यांच्या दृष्टीने गोदाम क्षेत्राचे महत्व अभ्यासणे.

**माहिती संकलनाचे स्त्रोत-** प्रस्तूत संशोधनपत्रासाठी आवश्यक असणारी माहिती मिळविण्यासाठी दुय्यम माहितीचा आधार घेतलेला आहे.

**१ शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून गोदामाचे महत्व :**

**१) विशेष सवलत :** ही सुगी काळात/हंगामाच्या वेळेस बाजारपेठेत शेतीमालाची आवक जास्त होत असल्यामुळे शेतकऱ्यांना कमी दरात शेती मालाची विक्री करावी लागत असल्यामूळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होते. ते टाळण्यासाठी सरकारतर्फे गोदामामध्ये २५% जागा आरक्षित व ५०% गोदाम भाडे दरात शेतकऱ्यांच्या शेतीमालास साठवणुकीसाठी सवलत देण्यात येते. शेतमालास किंमत येईपर्यंत माल गोदामात साठवून ठेवता येतो.

**२) तारण कर्ज योजना :** शेतकऱ्यांनी हंगामाच्या काळात व्यापाऱ्यांना शेतीमाल न विकता तो वखार महामंडळाच्या गोदामात साठवण ठेवावा लागतो. शेतकऱ्यांची आर्थिक अडचण दूर व्हावी म्हणून साठवणूक केलेल्या शेतीमालावर पीक कर्जाप्रमाणे मालाच्या किंमतीच्या ७० टक्के कर्ज देण्याची तात्काळ व्यवस्था सर्वच बँकाकडून करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक अडचण तातडीने दूर होऊन धान्याला अपेक्षीत बाजारभाव मिळेपर्यंत गोदामात कृषिमाल ठेवता येणार आहे.

**३) हमीभाव धान्य खरेदी योजना :** नाफेड आणि मार्केटिंग फेडरेशनकडून हमीभावाने ज्या ठिकाणी धान्य खरेदी योजना सुरू केली आहे. त्याकरिताही वखार महामंडळाद्वारे गोदामे प्राधान्यात उपलब्ध करून देण्यात येतात त्यामुळे शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ होतो. नैसर्गिक आपत्ती व व्यापारी देऊ करत असलेल्या किंमतीपासून शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण करण्यासाठी ही योजना राबविण्यात येते. बाजारपेठेत शेतीमालाच्या किंमती कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून शासनाने हमी भावाने धान्य खरेदी करुन शेतकऱ्याचे आर्थिक नुकसान कमी करु शकते. हमी भावाने खरेदी केलेला शेतीमाल शासन सरकारी गोदामात साठवणूक करून ठेवू शकते.

**४) शेती मालाची स्वच्छता प्रतवारी :** शेतमालाची मळणी यंत्राद्वारे केली जाते. शेतमालामध्ये काडी, कचरा, माती, दगड, इत्यादी असल्यामूळे त्यास चांगला बाजारभाव मिळत नाही. त्यासाठी काही गोदामाद्वारे शेतमालाची स्वच्छता, प्रतवारीसाठी स्वयंचलित मशिनरीची उपलब्धता असते. याव्दारे शेतमाल स्वच्छ करुन प्रतवारी केल्यामुळे व दर्जा उंचवल्याने शेतमालास सर्वोत्तम बाजारभाव मिळतो हे गोदामामुळे शक्य होत आहे.[१]

**२ किरकोळ व्यापाऱ्याच्या दृष्टिने गोदामाचे महत्व :**

**१) साठवण करणे :** किरकोळ व्यापारी उपभोक्त्याला गरज भासेल त्याचप्रमाणे आपल्या जवळच्या घाऊक व्यापाऱ्याकडून माल खरेदी करतो, कोणत्या मालाचा किती व कधी साठा करावयाचा हे अनुभवाने तो जाणू शकतो. किरकोळ व्यापाऱ्याकडे जागा व भांडवल कमी असतेच तसेच त्याला मालाचे अनेक प्रकार साठवून ठेवावे लागतात. विशिष्ट हंगामात किंवा दिवसात विशिष्ट वस्तूचा जास्त साठा ठेवावा लागतो म्हणून किरकोळ व्यापाऱ्याचे दुकान हे गोदामात असतेच.

**२) जोखीम पत्करणे :** किरकोळ व्यापारी थोडा तरी माल साठवत असतो. आग, चोरी, किंमतीतील बदल, उपभोक्त्याच्या आवडी-निवडीतील बदल या अनेक कारणांनी त्याचे नुकसान होण्याची शक्यता असते. किरकोळ व्यापारी ही जोखीम पत्करुन उपभोक्त्यांना त्यांच्या गरजेप्रमाणे माल गोदामात साठवून तो पुरविण्याचे महत्वाचे कार्य करीत असतो.

**३) गरजेप्रमाणे मालाचा साठा व पुरवठा :** उपभोक्त्याला उपयोगी असणाऱ्या सर्व वस्तूचा मोठ्या प्रमाणावर साठा शक्य नसते कारण त्यासाठी लागणारी जागा व पैसा त्याच्याजवळ नसतो. अशा वेळी उपभोक्त्यास लागणाऱ्या दैनंदिन उपभोगाच्या वस्तू लहान प्रमाणात गोदामात साठवणूक करुन त्याचा पुरवठा करण्याचे कार्य किरकोळ व्यापारी करीत असतो.[२]

**३ वितरक/घाऊक व्यापाराच्या दृष्टिने गोदाम/वखाराचे महत्वः**

**१) मालाचा साठा करणे आवश्यक :** घाऊक व्यापाराला उत्पादकाकडून मोठ्या प्रमाणावर मालाची खरेदी करावी लागते. पण विक्री मात्र किरकोळ व्यापाराना लहान प्रमाणात करावी लागते. म्हणजेच मालाला उठाव/मागणी येईपर्यंत घाऊक व्यापाराला मालाचा साठा करुन ठेवावाच लागतो यासाठी त्याच्याकडे गोदाम असावेच लागते. गोदाम हेच घाऊक व्यापाऱ्याचे दुकान असते.

**२) मागणी व पुरवठा यांचा समतोल :** घाऊक व्यापाराने मालाची साठवण केल्यामुळे बाजारपेठेला मागणी प्रमाणे पुरवठा करता येतो. यामुळे मालाचा जास्त पुरवठा ही होत नाही आणि तुटवडाही येत नाही. बाजारपेठेतील मागणी व पुरवठा यांचा समतोल साधण्याचे कार्य गोदामातील माल साठवणीमुळे होत असते.

**३) अनेक प्रकारचा माल एकत्र करणे (निवडीस वाव) :** वेगवेगळ्या उत्पादकांनी वेगवेगळ्या ठिकाणी तयार केलेला माल खरेदी करुन तो आपल्या गोदामामध्ये साठवून ठेवतो. वस्तू एकाच प्रकारच्या असल्यातरी अनेक उत्पादकाच्या वस्तूचे अनेक प्रकार असल्यामुळे किरकोळ व्यापाऱ्यांना गोदामामुळे निवडीस भरपूर वाव मिळतो.

**४) मालाचे वाटप करणे शक्य :** घाऊक व्यापाऱ्याच्या गोदामातून किरकोळ व्यापारी आवश्यकतेनुसार लहान प्रमाणात माल विकत घेत असतात. तसेच ग्राहक बनलेल्या किरकोळ व्यापाऱ्याच्या दुकानी आपला विक्री प्रतिनीधी पाठवून घाऊक व्यापारी मालाचे आदेश गोळा करीत असतो. या आदेशानुसार घाऊक व्यापारी आपल्या गोदामातून सर्व प्रकारचा माल संबंधित किरकोळ व्यापाऱ्यांना पाठविणे शक्य होते.

**५) माल तारणावर कर्ज :** घाऊक व्यापाऱ्याला गोदामातील त्याच्या मालाच्या तारणावर कर्ज देण्यास बँका तत्पर असतात. त्यामुळे घाऊक व्यापाऱ्यांना भांडवल ताबडतोब उपलब्ध होऊ शकते. त्याची आर्थिक अडचण दूर होवू शकते. हे केवळ गोदामामध्ये ठेवलेल्या मालाच्या आधारे गोदाम पावती मिळते व त्या आधारे कर्ज मिळते हे केवळ गोदामामुळेच शक्य झाले आहे.

**६)सुरक्षितता :** घाऊक व्यापारी उत्पादकाकडून मोठ्या प्रमाणावर माल खरेदी केल्यावर तो माल गोदामात सुरक्षित साठवून ठेवावा लागतो. आग, भूकंप, चोरी, व पूर इ. पासून होणाऱ्या नुकसानीची जोखीम पत्करणे गोदामामुळे शक्य आहे.[३]

**४ उत्पादकनाच्या दृष्टिने गोदामाचे महत्व :**

**१) उत्पादनात सातत्य :** छत्र्या, रेनकोट, स्वेटर्स, फटाके, वह्या, पुस्तके यांसारख्या वस्तू विशिष्ट मोसमातच विकल्या जातात. तसेच कापड, साखर, शेतीमाल इ. प्रकारचा वस्तू विशिष्ट ठिकाणी तयार किंवा उत्पादित होत असतात. त्या मालाचे ग्राहक देशभर निरनिराळ्या बाजारपेठेत विखुरलेले असतात. अशा मालाचे उत्पादन सातत्याने चालू ठेवल्यामूळे मालाच्या पुरवठ्याची खात्री वाटते. याकरिता मालाचा साठा करण्यासाठी गोदामे अत्यंत आवश्यक असतात.

**२) उत्पादन व मागणी या दोन घटकांत समतोल :** वस्तूचे उत्पादन झाल्यानंतर मागणी प्रमाणे पुरवठा करण्याकरिता उत्पादित वस्तूंचे संग्रहण करावे लागते. वस्तूची गोदामात साठवणूक करुन ठेवल्यास उत्पादन आणि मागणी या दोन घटकांत समतोल साधणे शक्य होते.

**३) खेळते भांडवल उभारण्यासाठी :** उत्पादन क्रिया सतत चालू ठेवण्याकरिता खेळत्या भांडवलाची आवश्यकता असते. अशावेळी उत्पादकाजवळील अर्धनिर्मित व निर्मित वस्तू, वस्तूचा संग्रह करून त्याची योग्य प्रकारे गोदामात साठवणूक केल्यास या संग्रहणाच्या तारणावर बँकेकडून खेळत्या भांडवलासाठी कर्ज मिळते.

**४) कच्चा मालाची उपलब्धता :** काही वेळा विशिष्ट वस्तू बाजारपेठेत मिळत नाहीत. त्यामूळे वस्तूच्या उत्पादनाची क्रिया बंद पडू नये म्हणून आवश्यक कच्चा मालाचे संग्रहण सुद्धा गोदामामुळे शक्य होते तसेच वस्तूंचे उत्पादनही सतत चालू ठेवता येते.

**५) माल वितरणाचा व्याप व खर्च कमी :** साठवणुकीच्या सोयीमुळे उत्पादक मोठ्या प्रमाणावर आवश्यक वस्तूची खरेदी करु शकतो. मोठ्या प्रमाणावरील खरेदीची सूट त्यांना मिळविता येते व खरेदीच्या ठिकाणाहून गोदामापर्यंतच्या वाहतुक खर्चात बचत करता येते. हे गोदामाच्या उपलब्धतेमुळेच शक्य होते.

**६) विस्तृत बाजारपेठा :** दूरदूरच्या अंतरावर असलेल्या बाजारपेठेत वस्तू पाठविण्यासाठी व विक्रीसाठी अनेक ठिकाणी अशा वस्तूचा साठा गोदामातच करावा लागतो.[४]

**५ आयातदार व निर्यातदार यांच्या दृष्टिने गोदामाचे महत्व :**

१. विदेशी व्यापारात कर भरण्यासंबंधीचे व्यवहार पूर्ण होईपर्यंत माल बंदरासारख्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात साठवून ठेवावा लागतो. त्यासाठी गोदामांची गरज आयातदार व निर्यातदार यांना असते.

२. परदेशातून आयात केलेल्या मालावर व्यापाऱ्यांना कर भरावा लागतो हा कर भरल्याशिवाय अधिकारी मालाचा ताबा व्यापाऱ्यांना देत नाहीत. कर भरला जाईपर्यंत असा माल गोदामातून साठवून ठेवतात.

**३) पुनर्निर्यातीसाठी उपयोग :** ज्या आयातदार व्यापाऱ्याची स्वतःची गोदामे नसतील किंवा व्यापारी कारणांसाठी ज्या व्यापाऱ्यांना स्वतःच्या गोदामात माल न्यावयाचा नसेल किंवा ज्या व्यापाऱ्यांना आयात मालाची पुनर्निर्यात करावयाची असेल त्यांना गोदामाचा उपयोग करता येतो.

**४) मालाच्या मालकीचे हस्तांस्तर शक्य :** कोणत्याही प्रकारच्या वस्तू गोदामात साठविल्या तरी पावतीचे मालधक्का अधिपत्र (Dock Warrant) मिळते. गोदाम पावतीचे पृष्ठांकन करुन ती हस्तांतरीत करता येत असल्यामूळे गोदामात साठविलेल्या वस्तूची प्रत्यक्ष वाहतूक न करता फक्त गोदाम पावतीच्या हस्तांतराने त्याला आयात वस्तूंची ताबडतोब विक्री करता येते. करदेय गोदामामध्ये वस्तू साठविल्यामूळे शक्य होते.

**५) मोठ्या प्रमाणावरील उत्पादन :** यांत्रिकीकरणामूळे वस्तूचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. किंवा ज्या वस्तूचे उत्पादन देशात होत नाही किंवा पुरेशा प्रमाणात होत नाही त्या आयात करुन ग्राहकांना त्याच्या गरजेनुसार पुरविता येतात. ह्याकरिता मालाची साठवणूक गोदामामध्येच करावी लागते.[५]

**६ केंद्र व राज्य सरकारांना गोदामाचे महत्व :**

**१) सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये गोदामाचे महत्व :** किंमती स्थिर ठेवणे, जीवनाश्यक वस्तूंच्या पुरवठ्यात कमतरता आल्यास शिधावाटप आणि समाजातील गरीब व गरजू घटकांना मूलभूत वस्तू खात्रीने उपलब्ध करून देणे ही बहुउद्दिष्टे साध्य

करण्यासाठी सार्वजनिक वितरण या देशात स्थापन करण्यात आले आहे. अन्नधान्याची साठवणूक, वाहतूक आणि नियंत्रण करण्याची जबाबदारी केंद्र व राज्य शासनाची आहे.

**२)अन्नधान्यासाठीचे अर्थसहाय्य :** राज्य सरकारला सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नधान्याच्या वितरणासाठी देण्यात येणारे अर्थसहाय्य प्रतिकूल काळासाठी गोदामात ठेवावयाच्या राखीव साठ्याचा देखभालीचा खर्च आणि अन्नधान्य, प्रापणासाठीची किंमत, विक्रीची किंमत यातील तफावतीमुळे राज्य शासनास सहन करावी लागणारी तूट किती आहे हे गोदाम क्षेत्रामुळे काढता येते. त्यास एकत्रितरित्या अन्नधान्यसाठीचे अर्थसहाय्य असे संबोधले जाते.

**३) किमान आधारभूत किंमत योजना :** नैसर्गिक आपत्ती व व्यापार देऊ करत असलेल्या कमी किंमतीपासून शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचे रक्षण करण्यासाठी तसेच कृषि कार्ये आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्यासाठी केंद्रशासन काही निवडक पिकासाठी किमान आधारभूत किंमती जाहीर करते. या योजनेअंतर्गत शेतमालाची खरेदी शासनाद्वारे केली जाते. असा खरेदी केलेला शेतमाल गोदामात साठवूण ठेवावा लागतो.

**४) गोदाम व्यवस्थापन :** सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करावयाच्या अन्नधान्याची उचल भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामातून करून राज्यशासनाच्या मालकीच्या/ भाड्याने घेतलेल्या गोदामात साठवणूक करावी लागते. त्यानुसार गोदाम क्षेत्राचे व्यवस्थापन केंद्र व राज्य सरकार करीत असते.

**५) राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान :** गरीब जनतेला/ग्राहकांना अन्न कमी किंमतीत मिळावे यासाठी तांदूळ, गहू व कडधान्ये याचे उत्पादन वाढविणे व जमिनीची उत्पादकता वाढवून सुपिकता टिकवून ठेवण्यासाठी राष्ट्रीय विकास परिषदेने ही योजना सुरु केली आहे त्यासाठी वर्षभर धान्य साठवणूक करण्यासाठी सरकारी गोदामाची आवश्यकता निर्माण झाली आहे.[६]

**७ ग्राहकांच्या दृष्टिकोनातून गोदामाचे महत्व :**

**१) वेळेवर उपलब्धता :** ग्राहकांना वेळेवर माल पुरविता यावा म्हणून विक्री केंद्राजवळ दुकानात मालाचा सतत साठा करावा लागतो. यासाठी गोदाम सेवा क्षेत्राची अत्यंत गरज असते.

**२) योग्य किंमत :** उपभोक्ते सुद्धा वस्तूचा साठा करून ठेवतात. टंचाई व भाववाढ अशा परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर उपभोक्ते अशा वस्तूचा साठा योग्य किंमत देऊन करून ठेवतात. त्यामुळे लहान गोदामांची आवश्यकता भासते.

**३) गरजांची पुर्तता सहज :** व्यापारी उपभोक्त्यांना हव्या असणाऱ्या मालाचा साठा नेहमीच करीत असतो. दुकानदारास उपभोक्त्याच्या आवडी-निवडी लक्षात येतात व त्याच्या आधारे दुकानात अनेक प्रकारच्या वस्तू मागणी येण्याअगोदरच गोदामात साठवून ठेवत असतो. अशा प्रकारच्या साठवणूकीमुळेच ग्राहकाला गरज निर्माण होताच हव्या त्या वस्तू मिळतात.

**४) ग्राहकांची पिळवणूक होत नाही :** माल गोदामात साठविल्यामूळे उपभोग व उत्पादन ह्यामध्ये मागणी व पुरवठ्यात सामंजस्य (समतोल) प्रस्थापित करता येते. त्यामुळे ग्राहकांची पिळवणूक होत नाही.

**५) नियमित पुरवठा :** एका ठिकाणी मोठ्या प्रमाणावर होणारे उत्पादन अनेक विक्री केंद्रातील गोदामामध्ये साठविले जाते. उद्या विकणारी वस्तू आज उत्पादित करून उद्यासाठी गोदामामध्येच साठविली जाते यामुळे उपभोक्त्यांना वर्षभर नियमित हवा तो माल मिळण्याची सोय उपलब्ध होते.[७]

शेतक-याचा गोदामात शेतमाल ठेवल्यास त्यांना गोदाम भाड्यामध्ये ५० टक्के सुट देण्यात येते. गोदाम पावती, तारण ठेऊन ७० टक्के कर्ज तात्काळ उपलब्ध होते. गोदामामुळे शेतक-यास हमीभाव मिळण्यास मदत होते. तसेच गोदाम क्षेत्राद्वारे शेतमालाची स्वच्छता व प्रतवारी करता येणे शक्य झाले आहे. किरकोळ व्यापा-यानांही मालाची साठवणूक करणे, गरजेप्रमाणे मालाचा पुरवठा करणे शक्य होत आहे. तसेच घाऊक व्यापा-यांनाही गोदाम क्षेत्राद्वारे मालाचा योग्य साठा करणे शक्य होते व मागणी पुरवठ्यामध्ये समतोल साधणे शक्य होत आहे. उत्पादकास आपल्या वस्तूच्या उत्पादनात सातत्य राखणे गोदाम क्षेत्रामुळे शक्य होत आहे. उत्पादन व मागणी या दोन घटकात समन्वय साधणे ही शक्य होते. आयातदार व निर्यातदार यांना सुध्दा पुर्नर्नियातीसाठी व मालाच्या मालकीचे हस्तांतर गोदाम क्षेत्रामुळे सहज शक्य होत आहे. केंद्र व राज्य सरकाराना सुध्दा सार्वजनिक वितरण राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान किमान आधारभुत किंमत योजना यासाठी गोदाम क्षेत्राची अत्यंत आवश्यकता आहे. ग्राहकांना सुध्दा गोदाम क्षेत्रामुळे मालाची वेळेवर उपलब्धता, योग्य किंमत व नियमित पुरवठा इत्यादी बाबी शक्य होत आहेत.

**संदर्भ-**

१. प्रा.भा.मा.मुजूमदार व प्रा.वा.ग.महाजन, वाणिज्य कार्यपद्धती आणि विपणी वृत, श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर, सप्टेंबर १९७७, पृ.क्र.४५-४७.
२. डॉ.प्रभाकर देशमुख, बाजारपेठेचे संघटन, विद्या प्रकाशन, नागपूर, मार्च १९७३, पृ.क्र.६३-६५.
३. डॉ.राजेंद्र वडनेरे, प्रभारी कुलसचिव, वाणिज्य व्यवहार पद्धती, यशवंतराव चव्हाण मराठवाडा मुक्त विद्यापीठ, नाशिक, मार्च २००७, पृ.क्र.४७.
४. प्रा.रा.गि.मिजार व प्रा.वि.ग.दाते, व्यापारशास्त्र परिचय, नितिन प्रकाशन, पुणे-३०, मे १९७०, पृ.क्र.१०६.
५. डॉ.सुनिल राणे, पर्चेसिंग ॲण्ड स्टोअरकिपिंग, विद्याभारती प्रकाशन, जानेवारी २०१०, पृ.क्र.३०-३१.
६. प्रा.रु.ज्ञा.कडू, आधुनिक विपणन, पडगिलवार प्रकाशन, नागपूर, डिसेंबर १९७६, पृ.क्र.१०२.
७. डॉ.प्रकाश अतकरे, कुलसचिव, वाणिज्य शास्त्र, यशवंतराव चव्हाण मराठवाडा मुक्त विद्यापीठ, नाशिक, जुलै २०१४, पृ.क्र.२५-३१.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com